**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जणांशी संपर्क; विदर्भातील चार तीर्थयात्री सुखरूप परतले.**
2. **आंदोलनकर्त्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्याची आदिवासी विकास मंत्र्यांची माहिती.**
3. **वर्धा जिल्हा गुंतवणूक परिषदेत ३ हजार ११ कोटी रुपयांचे सामंजस्य करार.**
4. **राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना देशाची आदरांजली.**
5. **पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून उद्या सकाळी ११ वाजता श्रोत्यांशी साधणार संवाद.**

---

नेपाळ पुर

नेपाळमधील अचानक आलेल्या पुरामुळे काठमांडूमध्ये अडकलेले विदर्भातील चार तीर्थयात्री आज सकाळी सुखरूप नागपुरात परतले. यामध्ये इंदिरा चौधरी, वर्ध्याच्या सुलोचना खापरे, हिंगणघाटचे दीपक पांडे आणि वर्षा उपाध्याय यांचा समावेश आहे. हे सर्वजण १९ ऑगस्टला पशुपतिनाथ मंदिराच्या दर्शनासाठी नेपाळला रवाना झाले होते. पुरामुळे नेपाळमधून बाहेर पडण्याचे मार्ग बंद झाल्याने ते काठमांडूत अडकले होते. दरम्यान नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जणांशी संपर्क झाला असून त्यातले ३७ जण मायदेशी परत यायला निघाले आहेत. मुंबईच्या एका पर्यटन संस्थेमार्फत गेलेल्या ६० पर्यटकांचा अद्याप पत्ता लागला नसल्याचं राज्यशासनाच्या पत्रकात म्हटलं आहे. राज्याच्या विविध भागातून गेलेले १४९ पर्यटक चीन किंवा तिबेटमधे सुरक्षित असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्रालयानं कळवलं असून त्यांची यादी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवली आहे. राज्यातल्या १०० भाविकांची बिहार राज्यसरकारच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. नेपाळहद्दीवरुन काल त्यांना सुरक्षाव्यवस्थेसह बिहारमधे आणलं. त्यांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था करुन त्यांना आज सकाळी साडेसात वाजता रेल्वे गाडीने महाराष्ट्राकडे

रवाना करण्यात आलं. दरम्यान, नेपाळमधे पुरातल्या बळींची संख्या आता ६२६ झाली आहे. अजूनही सुमारे २००० लोकांचा थांगपत्ता लागलेला नाही. तर सुमारे ५००० लोकांशी संपर्क तुटल्याची भीती आहे.

-----------------------------------------------

अशोक उईके

आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळानं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. वर्षा निवासस्थानी झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या सर्व मागण्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्या असून राज्यभरात विविध ठिकाणी सुरू असलेली उपोषणं आज संध्याकाळी पुण्यात जाऊन मागे घेण्याचं आवाहन केल जाणार असल्याचं आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी सांगितलं. मात्र, मागण्या मान्य केल्याचं लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेतलं जाणार नसल्याची प्रतिक्रिया विद्यार्थिनींनी दिली होती. त्यावर आंदोलक विद्यार्थ्यांना सर्व बाबी लेखी स्वरुपात मिळतील अस सांगत आज संध्याकाळी आंदोलन स्थगित करण्याचं आवाहन सरकारच्यावतीन केल जाणार असल्याच मंत्री उईके यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

उद्योगमंत्री सामंत

वर्ध्यातील उद्योगांची क्षमता आणि स्थानिक उद्योजकांचा उत्साह कौतुकास्पद असून, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी दिली. जिल्हा गुंतवणूक परिषदेत तब्बल 3 हजार 11 कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, या गुंतवणुकीतून जिल्ह्यात रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.वर्धा जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने आर्शिवाद सेलीब्रेशन हॉल इथं जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचं आयोजन आज करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर देखील उपस्थित होते. वर्ध्यातील उद्योजकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने उत्पादनांची निर्मिती आणि पॅकेजिंग करून नवा आदर्श निर्माण केला आहे. वर्ध्याचे हे मॉडेल संपूर्ण महाराष्ट्रात, तसेच रत्नागिरीसारख्या जिल्ह्यांमध्येही राबविण्याचा प्रयत्न केला जाईल, असं सामंत म्हणाले.

-----------------------------------------------

राष्ट्रीय क्रीडा दिन

राष्ट्रीय क्रीडा दिन आज साजरा केला जात आहे. देशात क्रीडा संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशानं हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट हा जन्मदिन २०१२ पासून राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मेजर ध्यानचंद यांना आदरांजली वाहिली आहे. हॉकी या खेळातलं मेजर ध्यानचंद यांचं नैपुण्य अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय युवा आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनीही आज नवी दिल्ली इथं मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. क्रीडा दिनानिमीत्त फिट इंडिया चळवळीला पुढची दिशा देण्याच्या उद्देशाने देशभरात 'खेळाच्या मैदानात एक तास' या उपक्रमाचं आयोजन केलं असल्याची माहिती त्यांनी *दिली.*

***(होल्ड बाईट - मनसुख मांडवीय - २२सेकंद)***

२०३६च्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा सहभाग आणि पदकसंख्या वाढवण्यासाठी लहान वयापासूनच क्रीडा क्षेत्रातली प्रतिभा शोधायची गरज आहे, असं प्रतिपादन केंद्रीय हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज केलं. क्रीडा दिनानिमित्त, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांवरच्या विशेष टपाल आवरणाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते पुण्यात बोलत होते. देशातल्या क्रीडा संघटना, ऑलिम्पिक संघटना आणि वेगवेगळ्या क्रीडा मंडळांनी ५ ते १५ वर्षं वयोगटातल्या मुलांमधले क्रीडा गुण हेरावेत, लहान वयातच गुणवान खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असं त्यांनी सुचवलं.

-----------------------------------------------

मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून उद्या सकाळी ११ वाजता देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा हा १३७वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनचं संपूर्ण नेटवर्क, न्यूजऑनएआयआर वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण केलं जाईल. हिंदीतील प्रक्षेपणांनंतर लगेचच आकाशवाणीद्वारे हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित केला जाईल.

-----------------------------------------------

काँग्रेसतर्फे आंदोलन

उत्तराखंडमधील हल्द्वानी इथं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर कथित शुद्धीकरण केल्याच्या निषेधार्थ नागपुरात इंदोरा चौकात काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आलं. आमदार डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. संबंधित दोषींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत एफआयआर दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी राऊत यांनी पोलिसांकडे केली.

-----------------------------------------------

Real Estate Infrastructure Investment Summit

नवीन नागपूर हे १,७१० एकर क्षेत्रावर विकसित होणार असून, कॉर्पोरेट्स, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स, स्टार्टअप्स आणि वित्तीय संस्थांसाठी एकात्मिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. महाराष्ट्र सरकारतर्फे नवीन नागपूर इथं इंटरनॅशनल बिझनेस अँड फायनान्स सेंटर (IBFC) उभारण्याची घोषणा देखील करण्यात आली आहे. याबाबत NMRDA Nagpur Region Development Authority ही २०२६ मध्ये सहभाग घेणार आहे. आगामी ३ सप्टेंबरला मुंबईत होणाऱ्या REIIS2026 मध्ये महाराष्ट्रासाठी १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर दिला जाणार आहे. NMRDA आयुक्त संजय मीणा यांनी IBFC मुळे नागपूर आणि मध्य भारतासाठी नवे व्यवसाय आणि गुंतवणूक केंद्र निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

-----------------------------------------------

दोन मातामृत्यू

अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात अवघ्या चार दिवसांत दोन मातामृत्यू झाल्याने दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चिखलदरा तालुक्यातील सती आणि धारणी तालुक्यातील धिंगऱ्या येथील गर्भवती मातांचा मृत्यू झाला. वेळेवर तपासणी, उपचार आणि संदर्भसेवा मिळाली का, याबाबत प्रश्न उपस्थित होत असून दोन्ही घटनांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.

-----------------------------------------------

समाजोपयोगी गणेश उत्सव

नागपूर महानगरपालिका, पोलीस आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव मंडळे आणि स्वयंसेवी संस्थांची समन्वय बैठक रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात झाली. महापौर निता ठाकरे यांनी गणेशोत्सव काळात सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी महिलांची आणि बालकांची सुरक्षा, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, रक्तदान, व्यसनमुक्ती आणि समाजप्रबोधन उपक्रमांना प्राधान्य देण्याचं आवाहन केलं. मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी नागरिकांनी 'आपली बस' आणि मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, तसंच कचरा आणि निर्माल्य एकाच ठिकाणी जमा करण्याच आवाहन केलं.

---------------------------------------------------

हवामान

हवामान! प्रादेशिक हवामान विभागाने विदर्भातील आठ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती आणि चंद्रपूर येथे तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, तर भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि वाशिम इथं काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील तीन तासांसाठी हा इशारा असून नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान नागपुरात आज दिवसभर रिमझिम पाऊस सुरु आहे. भंडारा जिल्ह्यातील पुजारीटोला धरणाच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने जलाशय परिचलन आराखड्यानुसार पाच वक्रद्वार प्रत्येकी ३० सेंमीने उघडण्यात आले असून, नदीपात्रात ३,९७४ क्युसेक विसर्ग सुरू आहे.

---------------------------------------------------

जात वैधता प्रमाणपत्र

राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्रुटींची पूर्तता करण्याची शेवटची संधी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अमरावती कार्यालय उद्या रविवारी पूर्णवेळ सुरू राहणार आहे. प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी तातडीने समिती कार्यालयाशी संपर्क साधून अर्जातील त्रुटींची पूर्तता करावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

---------------------------------------------------